# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.७/२०२५** **दिनांक ०२/०९/२०२५**
**स्थळ-जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर** **वेळ- दुपारी ०३.०० वा.**

**मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.९८/२०२१ व (सिव्हील ॲप्लीकेशन नं.११९७३/२०२१) यावर दि.१३/०९/२०२२ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करिता नियुक्त केलेल्या तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०२.०९.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/वशी-०४/२२९४/२०२५ दि.३०.०८.२०२५ रोजीचे पत्रान्वये सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आलेले होते.**

**त्यानुसार तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दि.०२.०९.२०२५ रोजी दुपारी ०३.०० वा. मिनी कॉन्फरन्स हॉल, जिल्हा न्यायालय, अहिल्यानगर येथे मा.श्रीमती अंजु शेंडे (सोनटक्के) प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.**

**या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.**

**मा.श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के),**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.डॉ.पंकज आशिया, भा.प्र.से.**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

**मा.श्री. गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

---

**विषय नं.१** **दि.१३.०८.२०२५ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.४१९ दि.१३.०८.२०२५ रोजी अहिल्यानगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.**

**(कार्यवाही-सभाकामकाज विभाग)**

---

**विषय नं.२** **चक्रिय पध्दतीने मान्यता दिलेले विषय वाचून कायम करणे.**

**१.** **साई धर्मशाळा यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छता कामाकरीता मे.डिस्टील एज्युकेशन अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि. दिल्ली यांचा कार्यादेश रद्द करुन काळया यादीत टाकणे व नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या खर्चास चक्रिय पध्दतीने मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२०/१** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही- साई धर्मशाळा)**

---

**२.** **साईआश्रम भक्तनिवास यांत्रिकीकरणासह हाऊसकिपींग स्वच्छता कामाकरीता मे.डिस्टील एज्युकेशन अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी प्रा.लि.दिल्ली यांचा कार्यादेश रद्द करुन काळया यादीत टाकणेस व नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस त्याकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२०/२** **चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही- साईआश्रम भक्तनिवास)**

---

**३.** **सन २०२५-२६ करीता एक वर्षाचे कालावधीसाठी पाणी पुरवठा विभागास पाणी शुध्दीकरणासाठी आवश्यक ब्लिचींग पावडर, फेरीक अ‍ॅलक, क्लोरीन गॅस सिलेंडर, व TCCA-90 क्लोरीन पावडर खरेदी करणेस व त्यासाठी येणारे रु.१५,४०,०००/- मात्रचे अपेक्षित अंदाजपत्रकीय खर्चास तसेच सदर मटेरिअल खरेदी विभागामार्फत खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२०/३ चक्रिय पध्दतीने घेण्यात आलेल्या निर्णयाचे अवलोकन करुन निर्णय कायम करण्यात आला.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.३ श्री साईबाबा शैक्षणिक संकुल येथील सांडपाणीचे नियोजन करणेकरीता पुर्व बाजुला टाकलेली ड्रेनेज लाईन शिर्डी नगरपालीका, शिर्डी यांचे मुख्य ड्रेनेज लाईनला जोडणेकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४२१ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.४ व्दारावती भक्तनिवास येथील पहिल्या व दुस-या मजल्यावरील खोल्यांचे रंगकाम करणेकामी ई-निविदेतील निम्नतम दराचे ठेकेदार यांनी परफॉर्मन्स सेक्युरिटीची रक्कम जमा न केल्यामुळे त्यांची निविदा रद्द करुन फेर ई-निविदा मागविणेबाबत.**

**निर्णय क्र.४२२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.५ संस्थानचे "श्री साईबाबा शैक्षणिक संकुल,शिर्डी (निमगाव को-हाळे)" चे परिसरात उभारणेत आलेल्या "श्री साईबाबा सांस्कृतीक भवन" (Auditorium Hall) वापराबाबतचे नियमावलीस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२३ संस्थानचे "श्री साईबाबा शैक्षणिक संकुल,शिर्डी (निमगाव को-हाळे)" चे परिसरात उभारणेत आलेल्या Auditorium Hall ला "श्री साईबाबा सांस्कृतीक भवन" नाव देण्याचा प्रस्ताव मंजूर.**

**नियमावलीचे अंमलबजावणीसाठी प्रशासकीय अधिकारी यांचे स्तरावर समिती स्थापन करण्यात यावी. संस्थानचे शैक्षणिक संकुल व संस्थानशी निगडीत असलेल्या कार्यक्रमांना प्राधान्य देण्यात यावे. झालेल्या चर्चेप्रमाणे नियमावलीमध्ये दुरुस्ती करुन सविस्तर फेर प्रस्ताव सादर करावा.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.६ साई आश्रम भक्तनिवास येथील सर्व १३ इमारतींचे स्कायलाईट डोमचे पॉलिकार्बोनेट शिट बदलणेसाठी येणारे रक्कम रु.३७,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२४ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.७ संस्थानचे शिर्डी व परिसरातील संस्थानचे जमीनीनां Precast R.C.C.Compound करणेकामाचे ठेकेदार श्री.आर.बी.कुंदे, श्रीरामपूर यांनी दंड आकारणी न करता दि.३१.१२.२०२५ पर्यंत मुदतवाढ मिळणेकामी केलेले अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४२५ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.८ वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपालिका व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजना (निळवंडे धरण उद्धव धरुन) ता. राहाता, जि.अहिल्यानगर टप्पा क्र.१ (संस्थान) कामाचे ३ रे धावते देयक व ४ थे आणि अंतिम देयक म.जी.प्रा.विभाग, संगमनेर यांनी प्रमाणित केलेप्रमाणे ठेकेदार दि इंडियन ह्युम पाईप कं.लि., पुणे यांना आदा करणेसाठी मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दि.२०.०१.२०२५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८ रद्द होणेस व सदरहू देयके ठेकेदार यांना आदा करणेसाठी मान्यता मिळणेस तसेच ठेकेदार यांनी मागणी केलेली अतिरिक्त रक्कम नाकारणेस व इतर अनुषंगीक बाबींवर निर्णय होणेबाबत.**

**निर्णय क्र.४२६ सदर विषयास शासनाची व मा.उच्च न्यायालयाची मान्यता मिळालेली असल्याने आता मा.उच्च न्यायालयामध्ये सी.ए.दाखल करण्याची आवश्यकता नाही, असे ठरले. दि.२०/०१/२०२५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५८ मधील उर्वरीत निर्णय कायम ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-पाणी पुरवठा विभाग)**

---

**विषय नं.९** **मेकॅनिकल विभागाकरीता आवश्यक फॅब्रीकेशन मटेरिअल व मशिनरी स्पेअरपार्ट खरेदीकामी येणा-या खर्चास व त्याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२७ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१०** **दक्षिणापेटीतील रक्कम मोजणी हॉलमध्ये वातानुकुलित (Air Conditioner) यंत्रणा बसविणेस याकामी येणा-या खर्चास व त्याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२८ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.११** **संस्थानचे सर्व भक्तनिवास स्थाने व रुग्णालये इमारतीचे टेरेसवरील जुनी सोलर हॉट वॉटर यंत्रणा बायबॅक करुन त्या ठिकाणी नवीन हिट पंप यंत्रणा बसविणेकामी येणा-या खर्चास व त्याकामी ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४२९ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- मेकॅनिकल विभाग)**

---

**विषय नं.१२** **साईभक्तांचे सुविधेसाठी असलेल्या सर्व निवासस्थानांच्या पुर्वीचे "निवासस्थान वितरण" नियमावलीमधील नियम क्र.२ मध्ये बदल करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३० प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास)**

---

**विषय नं.१३** **दर्शन व्यवस्थेबाबत**

**निर्णय क्र.४३१ प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही-जनसंपर्क विभाग)**

---

**विषय नं.१४ नव्याने सुरु करणेत आलेली ब्रेक दर्शन व्यवस्था नियमित सुरु ठेवणेबाबत.**

**निर्णय क्र.४३२ रु.५०,०००/- वरील देणगीदार साईभक्त वगळून उर्वरीत प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- जनसंपर्क विभाग)**

---

**विषय नं.१५ मौजे कनकुरी, मौजे निमगाव को-हाळे, ता.राहाता येथील जमीन खरेदी घेणेबाबत श्री.ज्ञानदेव देवराम पवार व इतर ४, श्री. रामराव मारुती डांगे व इतर ०२, सौ.शिल्पा चारुदत्त पाटील यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४३३ प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१६ मौजे शिर्डी, ता.राहाता येथील सर्व्हे १९५/४ पै. व सर्व्हे १९५/५ मधील काही क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना रस्त्यासाठी कायम खरेदी देणेबाबत श्री. आबासाहेब भास्कर कोते व छबुबाई भास्कर कोते यांच्या दि.२८.०४.२०२५ रोजीच्या अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४३४ तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१७ श्री साईबाबा संस्थान मालकीचे मौजे निमगाव को-हाळे,ता.राहाता येथील जमीन गट नं.८७ व ८८ मधील सैनिक आरामगृह, शिर्डी साठी लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर वापरास दिलेल्या जागेत बांधकाम करणेस परवानगी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३५ तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१८** **आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ (इस्कॉन) यांना भगवद्गीता वितरणासाठी स्टॉल/गाळयांच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३६** **तहकुब.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.१९** **श्री साईसच्चरित पारायण सोहळा-२०२५ करीता प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या सुधारीत तपशीलाबाबत.**

**निर्णय क्र.४३७** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२०** **श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०२५ साजरा करणेस व त्याकामी येणारे खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४३८** **अंदाजपत्रकीय तरतुदीप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२१** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सेवाप्रवेश नियम-२०२५ बाबत.**

**निर्णय क्र.४३९** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२२** **संस्थानचे कायम कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम, २०१९ सातव्या वेतन आयोगानुसार तीन लाभांची (१०,२० व ३०) सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करणेबाबत.**

**निर्णय क्र.४४०** **शासनाचे सातव्या वेतन आयोगानुसार सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेच्या निकषानुसार तसेच प्रस्तावीत सेवा प्रवेश नियमातील तरतुदीप्रमाणे लाभ मिळणेसाठीचा प्रस्ताव समितीपुढे सादर करावा.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२३** **मा.तदर्थ समितीचे निर्णयानुसार १)श्री.अमृत गंगाधर जगताप, सहा.अभियंता, औद्योगिक प्रशिक्षण संस्था २) श्री.नवनाथ भाऊसाहेब कोते, तत्कालीन प्र.वाहन विभाग प्रमुख (सेवानिवृत्त), ३) श्री.प्रकाश दादा क्षिरसागर, तत्कालीन प्र.वाहन विभाग प्रमुख (सेवानिवृत्त) यांचे समग्र चौकशी बाबत.**

**निर्णय क्र.४४१ प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२४** **श्री.जयवंत गुलाबराव सोनवणे, मदतनीस, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान यांचे गैरशिस्त वर्तनाबाबत.**

**निर्णय क्र.४४२ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२५** **श्री.भिमा दिनकर पाईक, सफाई कामगार, आरोग्य विभाग गैरशिस्त वर्तनावरुन केलेल्या निलंबनाबाबत.**

**निर्णय क्र.४४३ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२६** **श्री.बाळासाहेब केशव सावंत विद्युत पर्यवेक्षक, विद्युत विभाग यांनी मा.तदर्थ समिती, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे केलेल्या दि.०८.११.२०२४ रोजीचे अपील अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४४४ तहकुब.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२७** **श्री साईबाबा संस्थान व श्री साईबाबांबद्दल होणा-या चुकीच्या अफवा, आर्थिक फसवणूक व दिशाभूल करणा-या कृत्यांवर प्रतिबंध करण्यासाठी अधिकृत धोरण व यंत्रणा राबविणेबाबत.**

**निर्णय क्र.४४५ तहकुब.** **(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.२८ श्री साईबाबा महाविद्यालयामध्ये "राष्ट्रीय छात्र सेना (NCC)" सुरु करणेकामी प्रस्ताव तयार करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४४६ प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.२९ श्री साईबाबा शैक्षणिक संकुलाकडील स्पोटर्स कॉम्प्लेक्स मधील बॅडमिंटन कोर्ट शुल्क "सदस्यता शुल्क (Membership Fee)" आकारणीबाबत.**

**निर्णय क्र.४४७ प्रतिमहा शुल्क प्रस्ताव मंजूर. वार्षिक शुल्क एकरकमी संस्थान अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी रु.१०,०००/- आणि बाहेरील सदस्यांसाठी रु.२०,०००/- शुल्क आकारण्यात यावे.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा महाविद्यालय)**

---

**विषय नं.३० श्री साईबाबा शैक्षणिक संकुलाकडील जलतरण तलावाचे सदस्यांसाठी सुधारित शुल्क ठरविणेबाबत.**

**निर्णय क्र.४४८ प्रति महा शुल्क प्रस्ताव मंजूर. वार्षिक शुल्क एकरकमी संस्थान अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी रु.१०,०००/- आणि बाहेरील सदस्यांसाठी रु.२०,०००/- शुल्क आकारण्यात यावे.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर)**

---

**विषय नं.३१ श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, अधिनियम-२००४ मध्ये करावयाच्या सुधारणा/दुरुस्ती करणेकामी शासनास प्रस्ताव पाठविणेबाबत.**

**निर्णय क्र.४४९ तहकुब.**

**(कार्यवाही-विधी विभाग)**

---

**विषय नं.३२** **श्री.विजय नायडू, कोपरगाव यांनी इच्छा दर्शविलेप्रमाणे त्यांची "तांत्रिक सल्लागार" म्हणून विना मोबदला स्वरुपात नेमणूक करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४५०** **"तांत्रिक मार्गदर्शक" म्हणून विना मोबदला स्वरुपात नेमणूक करणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.३३** **श्री साईबाबा संस्थान कर्मचारी व त्यांच्या कुटूंबीयांच्या संरक्षणासाठी मोबाईल ॲप्लिकेशन बाबत.**

**निर्णय क्र.४५१** **प्रस्ताव नामंजूर.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.३४** **कुशल कंत्राटी कर्मचारी यांना कंत्राटी सहा.शिक्षक हे पदनाम लागू करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५२** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.३५** **श्री.सुदेश रामदास शिंदे, कुशल कंत्राटी कर्मचारी, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग यांची रुग्णालयीन विशेष पगारी रजा मंजूर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४५३** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.३६** **ठेकेदाराकडील कुशल कंत्राटी कर्मचारी (तांत्रिक) व कनिष्ठ अभियंता यांचे मानधनाबाबत.**

**निर्णय क्र.४५४** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- कामगार विभाग)**

---

**विषय नं.३७** **श्री साईनाथ रुग्णालय परिसरामध्ये भाडेतत्वावर औषध दुकान चालू करणे कामीच्या प्राप्त अधिकतम दरधारकास कार्यादेश देणेबाबत.**

**निर्णय क्र.४५५** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३८** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय विभागाकडे लेबर ठेकेदारामार्फत कार्यरत परिचारीका/परिचारक तसेच पॅरामेडीकल कर्मचारी यांचे वेतनवाढ मिळणेचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.४५६** **प्रस्ताव मंजूर.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.३९** **माहे जुलै-२०२५ जमा-खर्चाची नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४५७** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.४०** **शिर्डी नगरपरिषद हद्दीतील रस्त्यांच्या दैनंदिन स्वच्छता विषयक कामांचा तिमाही परिक्षण अहवाल नोंद घेणेबाबत.**

**निर्णय क्र.४५८** **नोंद घेतली.**

**(कार्यवाही-आरोग्य विभाग)**

---

**यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१**

**निर्णय क्र.४५९** **दि.१३.०८.२०२५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४१३ अन्वये विद्युत विभागात झालेल्या विद्युत साहित्यांच्या चोरी / अपहार / अनियमिततेबाबतचे संदर्भाने विभागीय चौकशी का करण्यात येऊ नये याबाबत संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग)**

---

**वरील निर्णय क्र.४१९ ते ४५९ सर्वानुमते घेण्यात आले.**
**यानंतर सायं. ५.४५ वा. सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरीत/-
**(गोरक्ष गाडीलकर, भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**(डॉ.पंकज आशिया,भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, अहिल्यानगर तथा**
**सदस्य, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**

स्वाक्षरीत/-
**[श्रीमती अंजू शेंडे (सोनटक्के)]**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, अहिल्यानगर तथा**
**अध्यक्षा, तदर्थ (Ad-hoc) समिती,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.**